थोडक्यात...

२ वर्षापासून दोन समाजात असलेला वाद मिटला

(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

चारठाणा – अँड सय्यद.वाय.ए.अंतुले यांनी दोन समाजातील वाद मिटवून निकाली काढण्यात आले न्यायालयात कायद्याची लढाई जिंकणारे अनेक असतात, परंतु कोर्टाबाहेर दोन समाजांतील तुटलेली मने जोडून माणुसकी आणि शांततेची लढाई जिंकणारे तुमच्यासारखे दुर्मिळ असतात. आमच्या गावातील दोन धर्मांमधील कायदेशीर वाद सामोपचाराने मिटवून, केस पूर्णपणे नील करण्यात आपण जी महत्त्वाची भूमिका बजावली, त्याबद्दल संपूर्ण गावाच्या वतीने आपले आभार. आपण केवळ केस संपवली नाही, तर दोन समाजांमध्ये आपुलकी, विश्वास आणि संगमताचे एक नवे पर्व सुरू केले आहे. दोन्ही बाजूंचे गैरसमज दूर करून, गावाला वादमुक्त आणि एकसंध ठेवण्याचे आपले हे प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहेत. तुमच्या या समजूतदार आणि सकारात्मक प्रयत्नांमुळे आमच्या गावाला एकतेचा नवा मार्ग मिळाला आहे.कागदावरचा वाद संपवून समाजात शांततेची पेरणी करणाऱ्या आपल्या या अतुलनीय कार्याला संपूर्ण गावाचा सलाम.

माजलगाव –तेलगाव महामार्गावरील रस्त्याच्या भेगाने घेतला आणखी एक बळी

(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)

माजलगाव – माजलगाव वरून जाणारा शेगाव – पंढरपुर राष्ट्रीय महामार्गावर पात्रुड च्या पुढे महामार्गावरील पडलेल्या भेगा मध्ये मोटार सायकल चे पुढचे टायर आडकून प्रवास करणाऱ्या मनिषा नामदेव थेटे (वय ४१)वर्ष यांचा डोक्याला जबर मार लागल्याने मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली सविस्तर वृत्त असे की राजेवाडी येथील नामदेव थेटे आपल्या दुचाकी वरून माजलगाव येथून पुतण्याच्या लग्नाचा बस्ता खरेदी साठी गेले असतांना रात्री परत गावी पत्नी सह दुचाकी वरून जातांना राष्ट्रीय महामार्गावर पात्रुड च्या पुढे लहामेवाडी पाटी जवळ सिमेंट रस्त्यास पडलेल्या मोठ्या भेगेत मोटार सायकलचे पुढील टायर अडकले व स्पीड मध्ये असणारी मोटार सायकल वरून दोघेही खाली जोरात पडले मागे बसलेल्या त्यांच्या पत्नी मनिषा नामदेव थेटे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर मार लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला तात्काळ कांही प्रवाशांनी त्यांना माजलगाव ग्रामिण रुग्नालयात घेऊन गेले असता तेथिल डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले त्यांचे मागे पती व दोन मुले असा परिवार आहे माजलगाव ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये आकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली मागील चार वर्षात या रस्त्यावर अपघात होऊन सुमारे ४० पेक्षा जास्त प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी ही अनेक वेळा अधिकाऱ्यांना धारेवर धरले मात्र त्याचा काहीही परीणाम झाला नाही मागिल महीन्यातच दै . धर्मयोद्धा मध्ये या रस्त्याच्या दुरुस्ती बाबत बातमी प्रकाशित झाली होती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आयुष चे श्री ओमप्रकाश शेटे यांनी ही या महामार्गाच्या दुरुस्ती साठी सुमारे ३० कोटी रूपये निधी मंजूर करून आनला असल्याच्या बातम्या ही प्रकाशित झाल्या होत्या मात्र आणखी किती बळी घेतल्यास हा महामार्ग दुरुस्त होणार अशा संतप्त प्रतीक्रिया नागरीकात ऊमटत आहेत.

पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्यांच्या जात प्रमाणपत्रांची चौकशी करण्याची मागणी

पूर्णा - तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आरक्षित जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांच्या जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रांची सखोल चौकशी करून, खोटी कागदपत्रे आढळल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी जनता दल सेक्युलरचे युवा जिल्हाध्यक्ष कुंदन गोकुळ ठाकूर यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तसेच राज्य निवडणूक आयोग यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात काही उमेदवारांनी चुकीची माहिती देऊन किंवा खोटे जात प्रमाणपत्र सादर करून निवडणूक लढविल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित उमेदवारांच्या जात प्रमाणपत्रे, वंशावळ, शैक्षणिक नोंदी तसेच जात वैधता प्रमाणपत्रांची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत बनावट अथवा खोटी कागदपत्रे वापरल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित सदस्यांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी तसेच, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी कुंदन ठाकूर यांनी केली आहे.

माहीम किल्ल्याचे संवर्धन करणे ही महानगरपालिकेसाठी गौरव आणि अभिमानाची बाब : महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे

माहीम किल्ल्याच्या संवर्धन व पुनरुज्जीवन संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका आणि सीमाशुल्क विभाग यांच्यात सामंजस्य करार

(पालिका वार्ताहर/ दै.धर्मयोध्दा)

मुंबई- माहीम किल्ल्याचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन होणे म्हणजे ऐतिहासिक सौंदर्य पुनरुज्जीवित करणे होय. बृहन्मुंबई महानगरपालिका या किल्ल्याचे संवर्धन करत आहे, ही गौरव आणि अभिमानाची बाब आहे, अशी भावना महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी व्यक्त केली आहे.

राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित असलेल्या माहीम किल्ल्याचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन कामासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका आणि सीमाशुल्क विभाग यांच्यात आज (दिनांक १८ जून २०२६) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यावेळी त्या बोलत होत्या.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, सीमाशुल्क विभागाचे प्रधान आयुक्त श्री. अजयकुमार पांडे, सीमाशुल्क विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्री. नितीन तगाडे, श्री. विक्रम फडके, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपआयुक्त (आयुक्त यांचे कार्यालय) श्री. प्रशांत गायकवाड, उपआयुक्त (परिमंडळ २) श्री. प्रशांत सपकाळे, सहायक आयुक्त (जी उत्तर विभाग) श्री. योगेश देसाई, पुरातन वारसा संवर्धन सल्लागार श्री. विकास दिलावरी, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेतील संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. के. के. सांगळे आदी यावेळी उपस्थित होते.

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात मुंबईतील पुरातन वास्तूंचे संवर्धन आणि जतन केले जाते. याच धर्तीवर, माहीम किल्ल्याचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे.

या सामंजस्य करार अंतर्गत, माहीम किल्ल्याच्या जीर्ण झालेल्या संरचनेचे मजबुतीकरण व पुनर्बांधणी करण्यात येईल. किल्ला परिसरातील ऐतिहासिक विहिरीचा शोध व उत्खनन केले जाईल. किल्ल्याच्या आतील परिघाभोवती पादचारी मार्ग विकसित करण्यात येईल. तसेच, किल्ल्याच्या पायाभरणीचे संरक्षण करण्यासाठी संरक्षक तटबंदी बांधण्यात येईल. यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, महानगरपालिकेच्या जी (उत्तर) विभागाकडून माहीम किल्ल्यावरील अतिक्रमण निष्कासित करुन तेथे वास्तव्यास असलेल्यांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यामुळे, आता या किल्ल्यास त्याचे वैभव आणि सौंदर्य प्राप्त करुन देण्यास मदत होईल.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी म्हणाल्या, ऐतिहासिक पुरातन वारसा असलेला माहीम किल्ल्यावरील अतिक्रमण निष्कासित करुन त्याचे संवर्धन करण्यासाठी महानगरपालिकेने खूप प्रयत्न केले आहेत. आता हा किल्ला पर्यटन स्थळाच्या रुपात विकसित करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.

सीमाशुल्क विभागाचे प्रधान आयुक्त श्री. अजयकुमार पांडे म्हणाले, ऐतिहासिक पुरातन वारसा असण्यासोबतच सीमाशुल्क विभागाचे कस्टम स्टेशन म्हणून माहीम किल्ल्याची ओळख आहे. महानगरपालिकेने हाती घेतलेल्या संवर्धन आणि पुनरुज्जीवनाच्या कामकाजामुळे या किल्ल्यास लौकिक प्राप्त होईल. तसेच, मुंबईकरांसाठी पर्यटनस्थळ म्हणून हा किल्ला विकसित होईल.

माहीम पुरातन किल्ला असून राजा बिंबदेव यांच्या वंशजांनी सुमारे बाराव्या आणि तेराव्या शतकात या किल्ल्याची उभारणी केली. मुंबईच्या सात बेटांपैकी माहीम हे सत्तेचे प्रमुख केंद्र होते आणि हा किल्ला त्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने १९७५ मध्ये माहीम किल्ल्यास राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ३ हजार ७९६.०२ चौरस मीटर आहे. सध्या हा किल्ला सीमाशुल्क विभागाच्या अखत्यारित आहे. माहीम किल्ल्याच्या विद्यमान संरचनेवर झोपडपट्टी स्वरूपातील अतिक्रमणे झाली होती. या संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण करून वैध कागदपत्रांची पडताळणी करुन २७५ झोपडीधारकांचे पुनर्वसन कुर्ला व मालाड येथील प्रकल्पग्रस्तांसाठी उपलब्ध सदनिकांमध्ये करण्यात आले आहे. तथापि, येथील एका धार्मिक संरचनेच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे जी (उत्तर) विभाग कार्यालय, सीमाशुल्क विभाग, पुरातन वारसा संवर्धन सल्लागार मेसर्स विकास दिलावरी आणि वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेचे संरचनात्मक अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. के. के. सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्याच्या पुनर्स्थापना व संवर्धनाचे काम हाती घेण्याचा प्रस्ताव आहे.

डासांचा उपद्रव वाढला

परभणी – शहरात मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे तापासारखे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डासांचा बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने धूर फवारणी करावी, वाढत्या डासांमुळे लहान मुलांना डेंग्यु मलेरीया सारख्या अजारांचा सामना करावा लागत आहे तर उन्हाळ्याच्या दिवसात पडणाऱ्या पासामुळे साचलेल्या पाण्यापासुन डासांची निर्मिती होऊ शकते यावर काहीतरी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

मानवत तालुक्यातील शेतकऱ्यांची पीकविमा योजनेत सुधारणा करण्याची मागणी

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत- दि. १९ जून २०२६ खरीप हंगाम २०२६ पासून प्रधानमंत्री पीकविमा योजनेत करण्यात आलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत असल्याचा आरोप करत मानवत तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील काही महत्त्वाच्या बाबी बंद केल्या आहेत. यामध्ये स्थानिक आपत्ती, काढणीनंतरचे नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती तसेच पेरणी न होणे या जोखमींचा समावेश पुन्हा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. इतर अनेक राज्यांमध्ये या बाबींचा समावेश असल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच पीकविमा योजनेतील उंबरठा उत्पादन निश्चित करण्यासाठी असलेला ७० टक्के जोखीम स्तर वाढवून १०० टक्के करण्यात यावा, अशीही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सध्याच्या निकषांमुळे नुकसान भरपाई कमी मिळत असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे निवेदन तहसील कार्यालय मानवत तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय मानवत यांना देण्यात आले असून, शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

योद्धा कोचिंग क्लासेस, करंजी येथे वार्षिक बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत - करंजी येथील योद्धा कोचिंग क्लासेसच्या वतीने आयोजित वार्षिक बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, पालक, शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. पंडित मोरे सर, विलास खरात सर, संजय काकडे सर, सोमनाथ झाकणे सर, मुंजा बनसकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक विठ्ठल मगर माजी सैनिक, गोपाल जाधव सरपंच, विठ्ठल जाधव,ग्रामपंचायत सदस्य, लखन जाधव योद्धा कोचिंग,बालाजी निलावाड, काशीकर सर यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रभाकर हरकळ, ज्ञानेश्वर पितळे, गुलाब पितळे, विठ्ठल जाधव, योगेश टेंगसे, बाबासाहेब जाधव, दामोधर पितळे, सतीश जाधव आदी पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

यावेळी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून बक्षीस वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही प्रगती करण्याचे आवाहन केले.

आपल्या मनोगतात प्रा. डॉ. पंडित मोरे यांनी ग्रामीण भागात योद्धा कोचिंग क्लासेससारखी संस्था उभारल्याबद्दल संचालक लखन जाधव यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, ''मोठमोठ्या शहरांमध्ये आर्थिक बळावर अनेक क्रीडा अकादमी स्थापन केल्या जातात; मात्र करंजीसारख्या ग्रामीण भागात अकादमी सुरू करून लहान वयातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम, शिस्त आणि राष्ट्रीय खेळाडू होण्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य लखन जाधव करीत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.''

यावेळी इतर मान्यवरांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत योद्धा कोचिंग क्लासेसच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन श्री.तुकाराम काशीकर तर आभार श्री लखन जाधव यांनी मानले कार्यक्रमास गावातील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

आम्ही खा. जाधव यांच्यासोबतच शिवसैनिकांचा निर्धार

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

मानवत– लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय जाधव यांनी घेतलेल्या राजकीय भूमिकेनंतर मानवत शहरातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपण खासदार संजय जाधव यांच्यासोबतच राहणार असल्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे. गेल्या काही दिवसांपासून राजकीय घडामोडींना वेग आला असून विविध स्तरावर चर्चा सुरू होती. या पार्श्वभूमीवर मानवत शहरातील अनेक शिवसैनिकांनी एकत्र येत आपल्या नेतृत्वावरील विश्वास कायम असल्याचे जाहीर केले. शहरातील पदाधिकारी, माजी नगरसेवक तसेच कार्यकर्त्यांनी आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी उपस्थितांनी खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी सांगितले की, जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच काळाची गरज आहे. बैठकीदरम्यान विविध सामाजिक, विकासात्मक आणि संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. आगामी काळात पक्षाची ताकद वाढविण्यासाठी गावपातळीवर संपर्क अभियान राबविण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी एकमुखाने घोषणा देत, ''आम्ही खा. जाधव यांच्यासोबतच राहणार'' असा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे मानवत शहरातील राजकीय वातावरणात या भूमिकेची चर्चा रंगू लागली आहे

विधान परिषद निवडणूकीसाठी आमदार सुरेश धस ठरले कॅप्टन

(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

बीड - बीड – लातुर – धाराशिव मतदार संघ निवडणूक साठी काल मतदान पार पडले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खंदे समर्थक आमदार सुरेश धस यांचे पुर्वी चे होमपीच असणारा हा मतदार संघ लातूर बीड – धाराशिव मधील सर्वच मतदारा पर्यंत प्रत्यक्ष संपर्क करत बसवराज पाटील यांच्या विजयाचा मार्ग अगदी सहज सोपा करणारे कॅप्टन आमदार सुरेश धस यांनी मतदारांची मोठी फिल्डींग लाव लावून मतदान पुर्ण करून घेतले बीड जिल्ह्यातील ११ मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदान दरम्यान भेटी देत मतदारांचा ऊत्साह वाढवला अनेक मतदारांनी आमदार सुरेश धस सोबत एकत्रीत फोटो काढत त्यांचाही ऊत्साह वाढवला मोठ्या मताधिक्याने बसवराज पाटील विजयी होणार हे माहीत असतांना ही शेवट पर्यंत आमदार धस यांनी प्रचारात सातत्य ठेवत आघाडी घेतली येत्या २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे केवळ विजयाचे शिक्का मोर्तब बाकी आहे मराठवाडा विभागातील चार ही ठीकाणी महायुतीचे उमेदवार वीजयी होणार असल्याचे वृत्त दैनिक धर्मयोद्धा मध्ये ८ दिवसा पूर्वीच प्रकाशित झाले होते तोच अंदाज कालच्या साम टीव्ही ने ही एक्झीट पोल मधुन व्यक्त केल्याने दैनिक धर्मयोद्धा चा अंदाज खरा ठरल्याचे वाचकांच्या प्रतिक्रीया मधुन दिसून येत आहे दरम्यान काल झालेल्या विधान परिषद निवडकीत भाजपा महायुतीचे चार ही ऊमेदार मोठ्या मताधिक्याने निवडूण येणार यावर अता शिक्कामोर्तबच बाकी आहे असे आहेत संभाव्य विजयी होणारे ऊमेदवार १) बीड – लातूर . धाराशिव मधुन भाजपा महायुतीचे बसवराज पाटील २) परभणी – हिंगोली मतदार संघातून शिंदे सेना महायुतीचे ऊमेदवार सईद खान ३) नांदेड मतदार संघातून भाजपा महा युतीचे ऊमेदवार अमर राजूरकर ४) छत्रपती संभाजीनगर –जालना मधुन भाजपा महायुतीचे श्री सुहास शिरसाट हे चार ही ऊमेवार मोठ्या मत्ताधिक्याने निवडूण येणार या वर फक्त शिक्कामोर्तब होणे बाकी आहे सर्वांच्या नजरा २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणी कडे लागल्या आहेत

शेतकऱ्यांनी स्वखर्चाने बनविला शेतरस्ता; चारठाणा परिसरातील रस्त्याची दुरावस्था

(बाळासाहेब मस्के/ दै. धर्मयोध्दा)

चारठाणा– रस्ता खराब असल्याने पावसाळ्यात शेतात जाण्या–येण्यासाठी नदीपासून शेतात जायला त्रास व्हायचा. कुठल्याही लोकप्रतिनिधींना न सांगता किंवा शासनाची मदत न घेता एक किलोमीटरचा स्वखर्चाने खराब झालेला पाणंद शेतरस्ता चारठाणा येथील काही तरुण शेतकऱ्यांनी एकत्र येत बनविला आहे. यासाठी दगड, मुरूम व माती ट्रॅक्टरने टाकून रस्ता दुरुस्त करण्यात आला. शेतीत कमी मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येत आहे. नांगरणी, पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी यासारखी कामे यंत्रामार्फत मोठ्या प्रमाणात करण्यात येतात. मात्र, बारमाही शेतरस्त्यांचा अभाव, अतिक्रमण आणि दुरवस्थेमुळे शेतापर्यंत यंत्रसामग्री पोचविण्यात अडचणी येतात. त्याचप्रमाणे तयार झालेला माल बाजारपेठेपर्यंत नेण्यातही अडथळा निर्माण होतो. प्रामुख्याने पावसाळ्यात शिवारांमध्ये पाणी साठणे व चिखलामुळे वाहतुकीचे काम त्रासदायक असल्याने दरवर्षी शेतकरी पावसाळ्यात त्रस्त असतात. एकीकडे गतिमान शासन जनतेला सुखसुविधा पुरवित असताना दुसरीकडे स्वखचनि शेत रस्ता तयार करणारी जनता चारठाणा येथे पाहवयास मिळाली पावसाळ्यात शेत रस्त्याविना त्रस्त असल्याने तरुण शेतकरीवर्गानी एकत्र येऊन चक्क रस्ता तयार केला आहे. चारठाणा येथील लोकांना पावसाळ्यात शेतात जाण्या– पाणंद रस्त्यावर स्वखर्चाने वाळू, मुरूम, दगड ट्रॅक्टरच्या साह्याने टाकून पांगवताना तरुण युवक. येण्यासाठी नदीपासून शेतात जायला त्रास व्हायचा. त्यांनी कुठल्याही लोकप्रतिनिधींना न सांगता किंवा शासनाची मदत न घेता एक किलोमीटरचा स्वखर्चाने खराब झालेला पाणंद शेत रस्त्यावर दगड, मुरूम व माती ट्रॅक्टरने टाकून रस्ता चांगल्या प्रकारे बनविला. येथील प्रगतशील शिवशंकर तमशेटे,भारत तोडकर,सुधाकर क्षीरसागर,रामकिसन मस्के, सचिन घाटूळ, मुन्ना तमशेटे,भुजंग सोनवणे,रामा वानखरे,या शेतकरी युवकांनी पुढाकार घेऊन हा रस्ता चांगल्या प्रकारे बनविला आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao